PC_8\Desktop\Election 2022-23/Marathi Letter/RP

# मुंबई विद्यापीठ

**निवडणूक विभाग**

## परिपत्रक

क्र.नि.वि./आयसीडी/२०२३-२४/**३०५**.

मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा व अभ्यासमंडळांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध कलमांतर्गत प्राचार्य, व्यवस्थापन प्रतिनिधी व विभागप्रमुख यांच्या निवडणूका बुधवार, दिनांक १२ जुलै, २०२३ रोजी विद्यापीठाने विहीत केलेल्या मतदान केंद्रांवर होणार आहेत.

याअनुषंगाने कळविण्यात येते की, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि पालघर या जिल्ह्यांतील महाविद्यालयांमधील जे प्राचार्य व विभागप्रमुख मतदार असतील आणि ज्यांना मतदान करावयाचे असेल अशा सर्वांना बुधवार, दिनांक १२ जुलै, २०२३ रोजी मतदान करण्याकरीता **"विशेष रजा"** देण्यात येत आहे.

मुंबई व ठाणे जिल्ह्यांतील सर्व संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्य व संचालकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मतदारांना मतदान करण्याकरीता आपल्या स्तरावर परवानगी देण्यात यावी. तसेच मतदान करू इच्छिणारे मतदार मतदानापासून वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरीत/-
(प्रा. सुनिल भिरूड)
प्रभारी कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

दिनांक : १० जुलै, २०२३
ठिकाण : मुंबई - ४०० ०३२.